# प्रकरण पाचवे

## सिंदगीकरांच्या कथांचे सामाजिक व वाङ्‌मयीन मूल्यमापन

# प्रकरण पाचवे

# सिंदगीकरांच्या कथांचे सामाजिक व वाङ्मयीन मूल्यमापन

मानवी जीवन आणि वाङ्मय यांचा अतूट असा संबंध असतो. जीवनातील वास्तवाचे प्रकटन हे साहित्यातून प्रभावीरित्या व्यक्त करण्याचा प्रयत्न केला जातो. वाङ्मयातून व्यक्त होणारे जीवन मानवी जीवनाशी संलग्न असेच असते. तो समाजाचा प्रतिबिंबित आरसा असतो. या वाङ्मयीन महात्मतेबद्दल बा.सी.मर्ढेकर म्हणतात, "महात्मता ही मूल्यभावावर अवलंबून असते आणि मूल्यभाव म्हणजे स्वानुभाव क्षेत्रात संगती उत्पन्न करून तिचा विश्व घटनांच्या वस्तुस्थितिनिदर्शक संगतीशी समन्वय लावणारे तत्त्व असे सांगून जितक्या भावना सखोल, कणखर तितकी संगतीची श्रेयस्करता अधिक असते."[१] म्हणजेच वाङ्मयातील महात्मतेशी संबंधित असणारा मूल्यभाव हा लेखकाच्या जीवन, विचार व अनुभवातून घ्यावा लागतो. त्यामुळे वाङ्मय हे उच्च कोटीतील सत्य व्यक्त करणारे साधन ठरते. समाज जीवनाला मार्ग दाखविण्याचे माध्यम म्हणून वाङ्मय संकल्पनेचा विचार करावा लागतो. वाङ्मय कलाकृतीतून अभिव्यक्त होणारा अनुभव हा जीवनानुभवाशी संलग्न असाच असतो. त्या अनुभवात एक संगती असते आणि त्यातूनच तो जीवनातील भावसत्याचे दर्शन घडविते. वाङ्मयातून व्यक्त होणारा अनुभव हा संवेदनशील भावनांच्याद्वारे व्यक्त होतो. अनुभवाच्या संगतीमधून लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाबरोबर कलाकृती घडत असते.

वाङ्मय हे मानवाने मानवांकरीता निर्माण केले असल्यामुळे त्यातून व्यक्त होणारे अनुभविक सत्ये ही मानवी जीवनाशी संलग्न असतात. कारण वाङ्मयाच्या माध्यमातून मानवी जीवनातील सत्य व्यक्त केले जाते. सर्वसामान्य वाचक वर्ग वाङ्मयाच्या श्रेष्ठत्त्वेबद्दल एक समीकरण आखताना दिसतो ते असे, "ज्यामध्ये जीवनव्यवहारांतील अत्यंत व्यापक, सखोल व अत्यंत सूक्ष्म अशी भावसत्यें, विचारसत्यें, जीवनसत्यें प्रकट झालेली असतात ते वाङ्मय त्यांना विशेष महत्त्वाचे वाटते; तेच श्रेष्ठ दर्जाचे वाङ्मय होय."[२] म्हणजेच वाङ्मय हे जीवनातील अत्यंत व्यापक व अत्यंत सूक्ष्म अशी जीवनसत्ये प्रकट करते.

'मूल्यमापन' या संकल्पनेचा विचार करता, "मूल्यमापन हे साहित्यकृतीच्या स्वरूपाशी, लेखकाच्या निर्मिती प्रक्रियेशी, वाचकांच्या आस्वाद क्रियेशी अथवा साहित्यकृती व समाज यांच्यातील परस्पर संबंधाशी निगडित असते."[३] विलास सिंदगीकरांच्या कथात्मक वाङ्मयाचा मूल्यमापनात्मक विचार करता त्यांनी आपली लेखनी आपल्या प्रश्नांपुरती बंदिस्त ठेवली नाही. समाजपरिर्वनाच्या भूमिकेतून ते दलित-ग्रामीण जीवनाबरोबर आदिवासी जीवनापर्यंतचा व्यापक जीवन पट आपल्या कथांतून मांडतात. त्यामुळे त्यांच्या कथा सामाजिक आशयाने व्यापलेल्या आहेत.

- **कथेतील सामाजिक समस्या :**

विलास सिंदगीकरांनी आपल्या कथांतून ग्रामीण-दलित-आदिवासी या तीन घटकांना केंद्रवर्ती ठेऊन सामाजिक समस्यांचे विवेचन केले आहे. ग्रामीण-दलित-आदिवासी समाजातील दु:ख, समस्या वेगवेगळ्या स्वरूपाचे असल्याचे दिसून येते. वास्तविक पाहता ग्रामीण समाजातील दु:ख हे आर्थिक स्वरूपाचे असते. दलितांचे दु:ख, समस्या या अस्पृश्यतेबरोबर आर्थिक स्वरूपाचे असते. तर आदिवासी समाजाचे दु:ख हे निसर्ग आणि मानवी संघर्षातून व्यक्त झालेले दिसते. हा समाज दुर्बल भागामध्ये राहत असल्यामुळे त्यांच्या प्राथमिक गरजांची पूर्तता होत नसल्यामुळे हा समाज अनेक समस्यांनी ग्रासलेला दिसतो. सिंदगीकर यांच्या कथांतून या प्रकारचा सामाजिक दृष्टिकोन अभिव्यक्त झाला आहे.

समाजाला अभिव्यक्त होण्याचे माध्यम म्हणजे साहित्य. त्यामुळे लेखक ज्या समाजामध्ये, ज्या परिसरामध्ये वावरतो त्याचा परिणाम त्यांच्या वाङ्मय कृतीवर झालेला दिसून येतो. भोवतालच्या सामाजिक परिस्थितीचे सूक्ष्म अवलोकन सिंदगीकर यांना असल्याचे दिसून येते. म्हणून ते समाजातील माणसे, त्यांच्या समस्या कथांतून अभिव्यक्त करतात.

**१. ग्रामीण समस्या :**

सिंदगीकरांनी ग्रामीण जीवनाचा सूक्ष्म अभ्यास केलेला आहे. ग्रामीण जीवनाचा अविभाज्य असा घटक म्हणजे शेती. आणि ही शेती निसर्गाच्या लहरीपणावर अवलंबून असल्याने शेतीशी संलग्न असणाऱ्या शेतकऱ्याचे जीवनच उद्ध्वस्त होताना दिसते. त्याचे

चित्रण त्यांनी 'गारपीट' या शीर्षक कथेतून केलेले आहे. म्हणजेच २१ व्या शतकात आत्महत्येसारख्या घडणाऱ्या घटनांचा, प्रसंगाचा, स्थितिगतीचा लेखक साक्षीदार आहे. शेतकरी आणि शेतकऱ्यापुढे निर्माण झालेला आत्महत्येसारखा मार्ग हा समाजापुढे न सुटलेला प्रश्न, समस्या आहे. कर्ज काढून शेती करणाऱ्या शेतकऱ्यांच्या हाताशी आलेल्या पिकांचे निसर्गाच्या कोपामुळे नुकसान होते. तेव्हा हतबल, दु:खी झालेल्या शेतकऱ्यांपुढे आधार म्हणून शासन मदत करण्याचा प्रयत्न करते. पण शासनाच्या अकार्यक्षम कारभारामुळे शेतकऱ्यांपुढे आत्महत्येसारखा दुसरा मार्गच उरत नाही. मराठवाड्याप्रमाणेच इतर सर्व प्रदेशामध्येही ही समस्या आ वासून समोर येते.

त्याचप्रमाणे विलास सिंदगीकरांनी ग्रामीण भागामध्ये असणारी अंधश्रद्धेसारखी समस्या मांडली आहे. ग्रामीण भागात अज्ञान, दारिद्र्य, समाजप्रबोधनाचा अभाव असल्यामुळे माणूस जीवन जगताना आलेल्या प्रसंगावर निर्भिडपणे मात न करता तो अंधश्रद्धेच्या मार्गाकडे वळताना दिसतो. 'देवकामायचं श्याडं', 'प्रतिशोध' 'इज्जत' या कथांचा उल्लेख करावा लागेल. ग्रामीण भागातील काही स्त्रिया अंगात आणण्याचे नाटक करुन, संकुचित मनोवृत्तीतून निर्माण झालेल्या देव या संकल्पनेचा आधार घेताना दिसतात. आपला स्वार्थी हेतू साध्य करण्यासाठी ठराविक रक्कम, प्राणी हत्या यासारखे उपाय सुचविताना दिसतात. पण ही समस्या आधुनिक काळात कमी न होता वेगाने वाटचाल करताना दिसते. तर 'हाकमारी' व 'चिकनगुन्या' या कथेत अज्ञान, वैद्यकीय माहितीचा अपुरा पुरवठा यामुळे अंधश्रद्धेला बळी पडणाऱ्या व्यक्ती दिसून येतात.

'ऑपरेशन' या कथेत कुटुंबनियोजनाचा विषय विनोदी अंगाने चित्रित केलेला असला तरी, वास्तविक पाहता भारताला मोठ्या प्रमाणात भेडसवणारी समस्या म्हणजे लोकसंख्या. ही लोकसंख्या आटोक्यात आणण्यासाठी शासनाकडून विविध उपक्रम अमंलात आणले जातात. पण अजूनही ग्रामीण भागात वैद्यकिय समाज प्रबोधनाचा अभाव असल्यामुळे लोकसंख्येचे प्रमाण वाढत आहे. त्याचप्रमाणे कुटुंबनियोजन ऑपरेशनच्या निमित्ताने अयशस्वी ऑपरेशन करून आपला स्वार्थ साधणारी ग्रामीण भागातील काही लोक असतात. 'इज्जत' या

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

कथेत गुप्तधन मिळविण्याच्या स्वार्थी हेतूने अंधश्रद्धेच्या नावाखाली नरबळी देण्याचा चाललेला प्रयत्न ही एक समस्या समाजाला भेडसावणारी आहे. याचे लेखकाने केलेले चित्रण प्रभावशाली आहे.

विलास सिंदगीकरांनी ग्रामीण समाजातील वास्तव समस्यांचे विवेचन करताना, शेतीसारख्या निसर्गावर अवलंबून असणाऱ्या घटकामुळे निर्माण झालेली आत्महत्येसारखी सामाजिक समस्या मांडली आहे. त्याचबरोबर कुटुंबनियोजनविषयक असणाऱ्या अज्ञानातून निर्माण झालेल्या समस्येबरोबर, अंधश्रद्धेवर विश्वास ठेऊन धनलोभापायी नरबळी देण्याचा चाललेला प्रयत्न या समस्येचे चित्रण लेखकाने वास्तवतेच्या दृष्टिकोणातून केलेले आहे.

**२. दलित समस्या :**

गावगाड्याशी संलग्न असणारा पण गावकुसाबाहेरील व्यवस्थेशी निगडित असलेल्या दलित समाजातील समस्यांना सिंदगीकरांनी कथांतून अभिव्यक्त करण्याचा प्रयत्न केलेला आहे. दलित समाजाला दु:ख, दारिद्र्य, अज्ञान, भूक यासारख्या समस्यांना सामोरे जावे लागते. दलित समाजातील जीवन म्हणजे संकटाची मालिकाच आहे असे म्हणावे लागते. 'उतरंड' या शीर्षक कथेतून सिंदगीकरांनी जातीमुळे निर्माण झालेली समस्या मांडलेली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या वैचारिक प्रभावामुळे मातंग समाजातील व्यक्ती जेव्हा बौद्ध धर्म स्वीकारते तेव्हा मात्र त्याला त्याच्याच जातीतील पण धर्मांतरीत नसलेल्या मातंग समाजामुळे संघर्ष करावा लागतो. म्हणजेच आजही जाती-जातीमध्ये असणारे वैचारिक मतभेद मांडण्यास कथाकार यशस्वी झालेला दिसतो.

'उद्ध्वस्त' या कथेतून स्पृश्य-अस्पृश्यतेची जाणीव लोकांच्या मनात खोलवर रूजलेली असल्याचे चित्रित केले आहे. स्पृश्य-अस्पृश्य या संकल्पनेमुळे दलित समाजातील पण स्पृश्य-अस्पृश्यतेची जाणीव नसणाऱ्या स्त्रीला केवळ पाणी भरण्याच्या प्रसंगामुळे अमानवी अत्याचाराला बळी पडावे लागते. त्यामुळे तिचे संपूर्ण कुटुंबच उद्ध्वस्त होताना दिसते. तर 'गायरान' या कथेत गायरान जमीन वाटण्याचा प्रश्न मांडला आहे. तसेच शिक्षणासारखे पवित्र क्षेत्र काही भ्रष्ट, स्वार्थी लोक अपवित्र करतात. याचे वर्णन 'अन्याय' या कथेतून मांडले आहे.

सिंदगीकरांनी ग्रामीण समाजाबरोबर दलित समाजातील जाती-धर्मामुळे, स्पृश्य-अस्पृश्यतेमुळे निर्माण झालेली समस्या ज्याप्रमाणे मांडली आहे. त्याचप्रमाणे अस्पृश्यतेच्या संकल्पनेमुळे निर्माण झालेली शिक्षणक्षेत्रातील अपवित्रता याचे वास्तव चित्रण केले आहे.

### ३. आदिवासी समस्या :

विलास सिंदगीकरांच्या 'भाकरीचं झाड' या कथेमध्ये आदिवासींच्या वास्तव जीवन संस्कृतीचे दर्शन घडते. नैसर्गिक संपत्तीवर वर्षानुवर्ष हक्क, वारसा सांगणारी आदिवासी जमात आहे. आदिवासी समाज हा शेकडो वर्षापासून उपेक्षित मानला गेला आहे. आदिवासींचे जीवन, त्यांचा निसर्गावर असणारा हक्क आणि त्यातून निर्माण झालेली वर्तमानकालीन समस्या या वास्तव जीवनाला भेडसावणाऱ्या आहेत. 'भाकरीचं झाड' या कथेमधील गोंड, कोलाम तोडा, कोळी, नाग, मादिगा, लमाण, मधुरी आणि गोरबंजारा या आदिवासी जमाती मोहाडी तांड्यामध्ये वास्तव करताना दिसतात. मोहाडी तांडा हा विकासापासून दूर असल्यामुळे निसर्गावर अवलंबून राहणे हा त्यांच्या जीवनाचा अविभाज्य असा घटक आहे. 'गजराबाई आडे' या स्त्रीच्या माध्यमातून सिंदगीकरांनी आदिवासी समाजातील ज्वलंत समस्येला शब्दांकित करण्याचा प्रयत्न केला आहे. २१ शतकात अजूनही भाकरीसाठी जेव्हा आदिवासी समाजाला पोटाची आग विझविण्यासाठी मोहाच्या फुलांपासून बनविलेली भाकरी खावी लागते आणि हे वास्तव आजच्या काळात दुर्लक्षित झालेले दिसते. या कथेच्या माध्यमातून आदिवासी जीवनाला न्याय देण्याचा यशस्वी प्रयत्न विलास सिंदगीकरांनी केला आहे.

### • वाङ्मयीन मूल्यमापन :

कोणत्याही कथासंग्रहाचे सामाजिक समस्येबरोबर वाङ्मयीन मूल्यमापन करताना कथेची भाषाशैली, प्रसंगनिर्मिती, वातावरणनिर्मिती, संवादलेखन आणि निवेदन पद्धती अशा घटकांचा आधार घ्यावा लागतो. त्याचप्रमाणे विलास सिंदगीकरांच्या कथांचा मूल्यमापनात्मक विचार करता खालील घटकांचा आधार घेतलेला आहे.

### • कथेतील निवेदन :

कथात्म साहित्य प्रकारामध्ये निवेदन पद्धत हा अविभाज्य असा भाग मानला

जातो. कथेमध्ये ज्याप्रमाणे संवादाची भाषा महत्त्वाची असते, त्याचप्रमाणे निवेदन हे ही महत्त्वाचे असते. कथेमधील घटना-प्रसंग जोडण्याचे काम निवेदक करत असतो. कथाकार आणि वाचक यांच्यामध्ये दुवा साधण्याचे संमिश्र काम निवेदन करत असते. निवेदनाविषयी रा.ग.जाधव म्हणतात, "कथासाहित्यात म्हणजे लघुकथा आणि कादंबरी यांत असलेला कथारूप आशय ज्या प्रकाराने सांगितला जातो, त्या प्रकाराला निवेदनाचे तंत्र म्हणण्यास काही हरकत नाही."[४] तर गंगाधर पाटील म्हणतात, "एकामागून एक या क्रमाने येणाऱ्या कल्पित घटनांच्या अनुषंगाने निवेदकाने विशिष्ट रीतीने केलेले निवेदन म्हणजेच कथनरूप साहित्य होय?"[५] निवेदनाच्या दृष्टिकोनातून विचार करता निवेदनाचे विविध प्रकार पडतात. कोणतीही एकच एक पद्धत पूर्णपणे योग्य आहे असे ठामपणे म्हणता येत नाही. निवेदनामध्ये प्रथमपुरूषी निवेदन व तृतीय पुरूषी निवेदन अशी विभागणी केलेली दिसून येते. प्रथमपुरूषी निवेदनामध्ये लेखक स्वत: एक पात्र होऊन वावरताना दिसतो. त्यातुलनेने इतर पात्र तटस्थपणाची भूमिका स्विकारताना दिसतात. प्रथमपुरूषी निवेदनामध्ये आत्मकथनाचा भाग आलेला दिसतो. त्यादृष्टीने सिंदगीकरांची 'भेट', 'देवकामायचं श्याडं', 'जखम', 'प्रतिशोध' या कथा महत्त्वाच्या वाटतात. त्यामध्ये 'उतरंड' या कथासंग्रहातील 'जखम' ही कथा उल्लेखनीय आहे. लेखकाचे भाऊ केशव अण्णा आजारी असताना जो वास्तवदर्शी प्रसंग आहे. तो लेखकाने पुढीलप्रमाणे निवेदनाच्या माध्यमातून चित्रित केला आहे. "माझा भाऊच गेला व्हता. माझा पाठराखणदार राहिला नव्हता. त्यामुळे मला कोणत्याही भानगडीत पडायचं नव्हतं. कारण गरिबी लई मायंदळ वाईट ऱ्हाते. गरीब लोक काय करू शकतात? त्यात मी तर काय करणार व्हतो. कारण गरिबी माणसाला लाचार बनवते. गरिबीनं केशव अण्णाचा बळी घेतला. माझ्यावर आभाळ कोसळलं व्हतं म्हणून म्या कुठं-कुठं म्हणून ठिगळ लावणार व्हतो. फकस्त मला केशव अण्णाचा मृतदेह जसाच्या तसा शाबूत पाह्यजे व्हता. म्हणून म्या त्यांनी कायबी लिहून घेतलं त्या कागदावर सही करायला राजी झालो. म्या कोणत्याबी हालतीत केशवभाऊचा देह जन्मभूमीत घेऊन जाण्यासाठी कंबर कसून तयार झालो. "(उतरंड, पृ.१४७) वरील निवेदनातून लेखकाच्या घराच्या आर्थिक परिस्थितीची जाणीव तर होतेच पण

लेखक गरीबीमुळे हतबल, दु:खी झालेला दिसतो. वास्तव जीवनातील सलत असणारी वेदना अभिव्यक्त करण्याचा प्रयत्न केलेला आहे. सिंदगीकरांची प्रत्येक कथा वाचत असताना नजरेसमोर जणू सर्व घटनांची चित्रफिती तयार होते. असे अनेक प्रसंग सिंदगीकरांनी निवेदनातून मांडले आहे. त्यामध्ये 'गारपीट' या कथासंग्रहातील 'टच्चा' या कथेतील सूर्याजी चव्हाण ही व्यक्ती जेव्हा गावामध्ये प्रवेश करते त्या प्रसंगाचे निवेदन बोलके झालेले आहे, "दिस मावळतीस झुकल्ता चांगल कळलेलं अंधार सूर्याला गिळत व्हता. अन् रानोमाळ शेतच्या कामाला गेलेली बाया-बापडे, गुरं-ढोरं वस्तीला वापस याल्ती. त्या वक्ताला रिमझिम पावसालाबी जारी झालं व्हतं. तसं सूर्याजी चव्हाण घिसाडी गावाला येऊन हाजर झाला. (गारपीट पृ.४५) सिंदगीकरांच्या निवेदनामध्ये एक प्रकारची गतिमानता, प्रवाहीपणा अनुभवास येतो. सायंकाळ झाल्यावर ग्रामीण परिसरात कोणत्या हालचाली होतात यांचे चित्रण करण्यासाठी निसर्ग प्रतिमांचा केलेला उपयोग निवेदनात जिवंतपणा आणतो. तात्पर्य सिंदगीकर यांनी कथांसाठी वापरलेली निवेदनशैली अनुभवाशी एकरूप होणारी आहे. शिवाय कथेतील अनुभव अधिक परिणामकारक करण्यासाठी त्या परिसराची भाषा आणि शैली उपयोगात आणतात.

- **संवाद :**

संवादाच्या माध्यमातून मानवी मनाच्या विविध पैलूचे दर्शन लेखक घडवित असतो. संवाद हा निवेदन पद्धतीचाच एक घटक मानला जातो. संवादाविषयी गंगाधर पाटील म्हणतात, "पात्रांचे व्यक्तिमत्त्व, त्यांची भावना, त्यांची संस्कृती संवादातून प्रतीत केली जाते. एक प्रकारे संवादातून प्रत्यक्ष पात्रांचे चित्रण केले जाते. म्हणजे संवाद हे व्यक्ती-व्यक्तींमधील भावसंबंधाचे व मूल्यभावाचे नाट्यात्म दर्शन घडवितात."[६] म्हणजेच संवाद हे पात्रनिर्मितीचे नाट्यात्मक दर्शन घडवितात. संवाद हा निवेदनपद्धतीचा एक महत्त्वाचा घटक असला तरी नाटकामध्ये जसा तो मुलभूत असतो तसा तो कथेमध्ये मूलभूत असेलच असे नाही. संवाद हा पात्रांच्या दृष्टीने अधिक परिणाम साधण्यासाठी महत्त्वाचा असतो. संवादामुळेच निवेदन व व्यक्तीदर्शन हे प्रभावशाली होतात. अर्थातच संवाद हे देशकाल


BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

परिस्थितीनुरूप असतात. कथानकामध्ये गतिमानता आणण्याचे काम संवाद करतात. लेखकाने व्यक्तीच्या स्वभावानुसार संवादाची मांडणी केलेली दिसून येते. प्रत्यक्ष घटित घटना आणि त्याबद्दल त्या पात्राची क्रिया-प्रतिक्रिया ही संवादाद्वारे समजू शकते.

'उतरंड' या कथासंग्रहातील 'चिकनगुन्या' या कथेतील संवादामधून मराठवाड्यातील स्त्रियांची बोलण्याची लकब, व्यक्त होण्याची पद्धत समजून येते. पार्वता आणि हरणा या दोन स्त्रियांमधील संवाद कथानकाला गती देण्याचे काम करते.

उदाहरणार्थ :

"तुला लई मायंदळ द्येव आलं गं ऽ! गरिबाकडं बघायला तुला कुठं वकूत हाय चार दिसापास्नं कुठं शिरून बसलीस."

"आवं आत्या, तुमी मला काय म्हणून टोचून बोलत्याव? चार दिसापास्नं घरी पावणे रावळे आल्यात त्याच्यानं तुमाला बोलत बसायला पुरसतच मिळाली नाय बघा."

"आग बैना, म्या उगं उगं तुझी चेष्टा केलेव तू काय मनाला लावून घेऊ नगस" पारूबाईने हारणाची समजूत काढली. "तुमी थट्टा करत्याव ते म्या पईलंच वळखून हाय." (उतरंड, पृ.११३)

वरील संवादातून ग्रामीण भागातील शेजारी राहणाऱ्या स्त्रियांना एकमेकीबद्दल वाटणारे कुतूहल, आपुलकीने केलेली विचारपूस या गोष्टी प्रकर्षाने दिसून येतात.

'भूकबळी' या कथासंग्रहातील 'ऑपरेशन' या कथेतील संवाद विनोदी पद्धतीने वाटचाल करताना दिसतात. कुटुंबनियोजनाच्या ऑपरेशनला घाबरणारी सगूना ऑपरेशनला तयार होते. पण ज्या दिवशी ती ऑपरेशनला जाणार असते तेव्हा ती लेखकाच्या गळ्यात पडून मोठ्याने रडत म्हणते,

"विलास भावजी, म्या कधी न्हाय ते आपरेसनला चालेलेव...माय? माझं आपरेसन व्हतय त्याच्यानं मला कसततीचं वाटतंय व माऽय भावोजी?"

"ऑपरेशनला घाबरायचं कांहीच कारण नाही. ऑपरेशन कसं करतात ते तुम्हाला समजत सुद्धा नाही."

"मग म्या कुठं नग म्हणतेय...! बरीक बाय्या कायबी म्हणत्यात. त्याच्यानं माझ्या पोटात कसंतरीच व्हतंय" ती पुन्हा मोठ्याने रडू लागली.

"तुम्ही लोकाचं कांहीही मनावर घेऊ नका." (भूकबळी पृ.३२)

तात्पर्य ग्रमीण भागात अजूनही अज्ञानामुळे कुटुंबनियोजनासारख्या विषयाला काही स्त्रिया घाबरताना दिसतात.

'गारपीट' या कथासंग्रहातील 'भाकरीचं झाड' या कथेतील आदिवासी समाजातील मोहाची फुले गोळा करणाऱ्या गजराबाईवरती केस होते. तेव्हा कोर्टात मोहाच्या रांजणाविषयी कबुली देताना जो लेखकाने संवाद चित्रित केलेला आहे, त्यातून तिचा प्रामाणिकपणा, साधेपणा दिसून येतो.

"सायब, तीन रांजणं लिव्हलं ते साफ खोटं हाय म्या चांगले पाच रांजण मव्हं जमा केलते ना वं...सायब."

"मग दोन रांजण मोह कोठे गेले ?"

"तुमी मला काय इचारता जी? बघ बया, ते मला काय ठाव नायजी ? तुमी त्या फौजदार सायबांनाच इचारा जी?"

"अहो गजराबाई, या पंचनाम्यात फक्त तीन रांजण मोहाची फुल गोळा केल्याच उल्लेख आहे."

"अन् बघ बया ऽ, म्या चांगली पाच रांजण मोह गोळा केल्ते ना...व... सायबऽ? आन् अंगणात दोन एक रांजणाचे वाळू घातले व्हते त्या सम्दं लिव्हलं नाय का जी? " (गारपीट पृ.७१)

वरील संवादातून आदिवासी समाजातील गजराबाईचा सच्चेपणा, निर्भिडपणा दिसून येतो. अशा अनेकविध संवादातून पात्रांच्या व्यक्तिमत्त्वाबरोबर त्यांच्या स्वभावविशेषावर भर टाकण्याचे कार्य लेखकाने सिद्धीस नेले आहे.

- **भाषाशैली :**

भाषा ही आपल्या मनातील विचार व भावना शब्दांद्वारे व्यक्त करण्याचे एक प्रभावी माध्यम आहे. लेखक आपल्या प्रतिभाशक्तीच्या सामर्थ्यावर भाषेच्या माध्यमातून कलाकृती निर्मिती करीत असतो. लेखक ज्या समाजामध्ये वावरतो त्या समाजाकडून लेखकाने भाषा आत्मसात केलेली असते. विलास सिंदगीकरांनी आपल्या कथांमध्ये मराठवाड्यासारख्या प्रदेशातील विशेषत: उदगीर भागात जी खास भाषा बोलली जाते. तिचा उपयोग केला आहे. त्यांनी आपल्या काही कथांमधून गतजीवनाचे चित्रण केलेले आहे. वास्तविक पाहता मानवी जीवनाचे वास्तव साहित्यातून प्रकट व्हायचे असेल तर त्या त्या प्रदेशातील बोलीचा वापर साहित्यिकाला करावा लागतो. कलाकृतीचा आशय अभिव्यक्त होण्यासाठी भाषेचा वापर केला जातो. सिंदगीकरांनी ग्रामीण-दलित समाजात बोलल्या जाणाऱ्या भाषेचा, बोलीचा वापर केला आहे. शिवाय भाषा अधिक प्रभावशाली होण्यासाठी त्यांनी त्या भागातील शिव्याचाही वापर केला आहे. त्याचप्रमाणे इंग्रजी-हिंदी शब्दांचा, वाक्यांचा वापर करताना दिसतात. सिंदगीकरांच्या तीनही कथासंग्रहात या प्रकारची भाषा अनुभवास येते.

**१. 'भूकबळी' मधील भाषा :**

**अ. शिव्यासदृश्य भाषा :**

प्रस्तुत कथासंग्रहामध्ये विलास सिंदगीकरांनी मराठवाड्यातील गावपातळीवरील शिव्यांचा ही प्रसंगानुरूप व प्रभावी वापर केलेला आहे.

उदा. "मर मेल्या मुडद्या लैय फुकटाची खाऊन माज आला व्हाय रं...तुला" (भूकबळी पृ. ४७)

उपरोक्त ओळीतून सिंदगीकरांनी शिवी वापरली आहे. परंतु त्या प्रदेशाच्या वैशिष्ट्यानुसार अश्लिलतेचा कोठेही लवलेश नाही. त्यांनी शिव्यांचा केलेला वापर प्रभावी वाटतो. प्रस्तुत कथासंग्रहामध्ये विलास सिंदगीकरांनी अनेक वेळा शिव्याचा वापर केला आहे. त्या खालीलप्रमाणे

१. "उठं रांड? छिनाल कुठली की? "[७]

२. "मुर्खा ऽ माझ्या समोरनं चालता हो ऽ?"[८]

३. "मारा...मारा, हारामखोरांना ऽ!"[९]

४. "मारा... हाना...लगावा...हरामखोराला...जीवंत ठेवू नका ?"[१०]

५. "आगं, अंगातून चला निघा रांडा व्हा ऽ!"[११]

६. "आगं...गं...गं... रंडे ऽ! "[१२]

७. "बाजूला हो ऽ बेसरम ऽ!"[१३]

८. "चंडके ऽ तू कुठं पळतीयांस ग ? थांब, तुला दाखवते इंगा ?"[१४]

९. "म्या काय तुला बाय दिसतो व्हय रं...ये ऽ हरामखोरा ऽऽ!"[१५]

## ब. इंग्रजी शब्द-वाक्य :

विलास सिंदगीकरांनी प्रमाणभाषेच्या जोडीला इंग्रजी भाषेचा वापर केलेला आहे. ग्रामीण भागात देखील बोली भाषा बोलत असताना काही इग्रंजी शब्दांचा उच्चार केला आहे. तो पुढीलप्रमाणे गिलासात, शिट, मिटींग, बुक, बँडबाज्या, पाट्यी, पॅनल, स्टेशन, मेडिकल, बसस्टँड, ग्यारंटी, टिकीट, इंजिनिअर, टायमाला, इंजेक्शन, मे आय सीट हिअर ?, पर्स, ॲटमबॉम्ब, गुड मॉर्निंग माय डिअर फ्रेंड, आर्जट, म्याटरीक, पप्पा, डेपो, ऑपरेशन, सर, स्किम, लिपिस्टिक, ब्युटीपार्लर, हिल, प्लीज, आय रिक्वेस्ट यू, मॅथचं प्रोब्लेम, थँक्यू...! कॅन्टीन, पिरियडची बेल, बिल, गार्डन, फॅशन, ट्रु लव्ह इज नॉट चेंज, टेम, हाऊसफुल, साईनाईट, पिना.

## २. 'गारपीट' मधील भाषा :

प्रस्तुत कथासंग्रहातून लेखकाने ग्रामीण दलित-आदिवासी या त्रयी समाज घटकाच्या बोलभाषेचा वापर करून कथाशयाला एक प्रकारचा जिवंतपणा प्राप्त करून दिलेला आहे. त्याचप्रमाणे त्यांनी काही कथामध्ये पत्रात्मकतेचा वापर केलेला आहे. विलास सिंदगीकरांच्या कथासंग्रहामधील शिव्या या कथाशयाला अनुसरून आल्याचे दिसून येते. त्याचा आढावा पुढीलप्रमाणे -

**अ. शिव्यासदृश्य भाषा :**

घिसाडी समाजातील सूर्याजी चव्हाण मद्य प्राशन करून तो आपल्या पत्नीला शिव्या देताना म्हणतो, उदा. "म्या दारू पिओ रं? मयो रांड नीट ऱ्हात नाय परीओ? (गारपीट पृ. ४८) यासारख्या अनेक शिव्याचा वापर प्रभावीरित्या केलेला आहे तो पुढीलप्रमाणे.

१. "ये ऽ खज्याळ रांडं ऽ म्या लोकास्नी भीत नाय रं...?"[१६]

२. "त्या रांडेनं माझा डोळा फोडला...!"[१७]

३. "तुझ्या कुजक्या संस्कृतीवर गाढवं..."[१८]

४. "आर थांबा, हरामखारांनो ऽऽ"[१९]

५. "ये ऽ हेंद्र्या कुठं निघालास ?"[२०]

६. "आरं भाड खाऊ, मला बघून बघून दातं काढता काय ?"[२१]

७. "मूर्ख कुठले की ? येथील मुले काय हलकट आहेत ग...?
आपणाकडेच पाहून हासतात मेले ऽ!"[२२]

८. "आगं, तो भडवा कोठे लपून बसलाय ?"[२३]

९. "आगं ये ऽ भवाने"[२४]

१०. "त्याच्या मायला रेडा लावू ?"[२५]

**ब. इंग्रजी शब्द - वाक्य :**

चेक, लाईट, बँड, बॅटऱ्या, बँक, हॅलो ऽ हॅलो ऽऽ, बेडरूम, डायनिंग हॉल, किचन, बेड्स, ड्रेसिंग टेबल, शोकेस, डेकोरेटिव्ह, पिसेस, परफ्युमस्, मेक-अप बॉक्स, टि.व्ही., व्ही.सी.आर., सी.डी. प्लेअर, ड्रेस, डॉक्टर, इंजिनिअर, जीन पँट, टी शर्ट, सर, टायमाला, इस्किम, धिस स्टच्यू इज डॉ.भीमराव आंबेडकर मिन्स डॉ.बाबासाहेब आंबेडकर?, डॉ.बाबासाहेब आंबेडकर वॉज अ व्हेरी ग्रेट मॅन इन दी वर्ल्ड आय लाईक डॉ.बाबासाहेब आंबेडकर, स्कॉलर, मिस्टर, व्हॉट इस धिज? धिस इज अ इंडियन क्लचर, प्लीज, लेडीज ॲन्ड जेटलमन...बी टेक केअर...धिस इज दी बिग घोस्ट...इट इज नॉट अ गेस्ट ! ही इज नॉट ह्युमन मॅन...?

'गारपीट' या कथासंग्रहामध्ये आणखी एक विशेष म्हणजे, पुजा पाठ करताना ब्राह्मण लोक जे मंत्र उच्चारतात त्याचा उल्लेख केलेला दिसून येतो, "गंधम पुष्प समर्पयामी... हरिद्रा कुंकम समर्पयामी...अक्षता गंधम समर्पयामी...धुपम देवता...समर्पयामी ओम ऽ भट...साह्य...गणपती नमोय...हरी... हरी तुम्ही कळसाला हळद-कुंकू लावा पाया पडा" [२६] तसेच 'संपत्याचं लगीन' या कथेमध्ये विवाहासदंर्भात जी उखाणे घेतले जातात, त्याचा कथानकाच्या दृष्टीने लेखकाने उल्लेख केला आहे. "केळीचं पाऽन...टरू टरू फाटतय, आन्. . .त्येंचच न्हाव घ्यायला मपला कसंतरीच वाटतय व...माऽय व्हयनी." [२७] त्याचप्रमाणे घिसाडी समाजातील सूर्याजी चव्हाण जेव्हा आपल्या मुलावर रागवताना म्हणतो, "हायओ रावण्या, गाढवं गयस्नो? गाढवं पाटलाच्या वावराला लागेस्नो तो पाटील मारास्नों. गाढवं जल्दीन हाकलस्नरं बाबा?" [२८]

## ३. 'उतरंड' मधील भाषा :

'उतरंड' या कथासंग्रहासाठी वापरलेली भाषा ही वास्तव जीवनाचा आशय गर्भ सांगून जाते. सिंदगीकरांच्या कथांसाठी वापरलेली भाषा प्रमाणभाषेबरोबर बोली भाषा ही अवतरताना दिसते. त्यांनी तीनही कथासंग्रहांच्या कथानकाला प्रभावीरित्या मांडण्यासाठी शिव्याचा वापर केलेला दिसून येतो.

### अ. शिव्यासदृश्य भाषा :

१. "काय येडं रांडरू हाय रं ऽ?" [२९]

२. "येड्या मायचं खुळ न्हेवणं" [३०]

३. "साल्याला जिवंतच ठेवायचं नाय" [३१]

४. "त्या हरामखोराला ऽ घरच्यावाणी वागवलं." [३२]

५. "त्या देवाचं मढं गेलं..." [३३]

६. "आरं रंगू ऽ याचा बोंधा बसविला नेवणं" [३४]

७. "भाड्या कुठं गेला आसंल मनाव ?" [३५]

८. "आरं थांब ऽ तुझं मढं बसु दे ? भाड्या पोटाला आला नसतास तर बरं झालं



BARR. BALASAHEB KH. DEK. LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

असतं.”[३६]

९. “आगं खज्याल रांड”[३७]

१०. “कंडाळ चाळ्यानं का रडतीस ग ऽ ?”[३८]

त्याचप्रमाणे अध्यात्मातील मंत्राचा ही वापर केलेला आहे.

उदा. “ओम ऽ नमो शिवाय...सूर्वे भवतो सुखम... माझ्या भाविक भक्तांनों ऽ!”[३९]

हिंदी-मराठी अशा मिश्र भाषेचा वापर काही कथांमध्ये केलेला आहे.

उदा. १. “म्या नहीच आया था...पाटील का रंग्याच आया था...उगं...उगं मेरा नाम घेराय.”[४०]

२. “मुझे कितनाबी मारो म्या नही आया था यह काम रंग्या का हाय जी.”[४१]

३. “चाच्या मै जळकोटका गाववाला छोकरा हूँ। मैं बीस बावीस साल पहिले यहाँ अभ्यास करणे के लिए आया करता था.”[४२]

**ब. इंग्रजी शब्द-वाक्य :**

डॉक्टरेट, हॉटेल, टी.टेबल, टि.व्ही., फ्रिज, वाशिंग मशिन, टेपरेकॉर्डर, व्ही.सी.डी.एड्स, आर्जेंट, लोडशेडिंग, लाईट, क्लिनर, राईट, हॉर्न, शॉक, मिडीया, स्टेशन, एफ.आय.आर, मिटींग, रूम, रिटायर, मेंबर, थ्यॉक्यू सर, यस सर, अपसेंटी, पी.आर.सी. कॅटलॉग, प्रोसिडिंग बुक, टि.सी. बुक, बॉस, डॉक्टर, स्टेजला, इंजेक्शन, इट इज सिरिअस केस, तर 'जखम' या कथेमध्ये लेखक आपल्या मृत भावाचा देह (शव) आहे त्या अवस्थेत देण्यासाठी डॉक्टरांना विनंती करताना म्हणतात, “प्लीज डॉक्टर, आय ॲम रिक्वेस्ट यू बिकॉज आय मस्ट वॉंटेड माय ब्रदर्स डेड बॉडी विदाआऊट पोस्ट मॉर्टम...!”[४३]

- **लेखकाची तटस्थवृत्ती :**

कथाकार विलास सिंदगीकरांच्या अनुक्रमे 'भूकबळी', 'गारपीट' आणि 'उतरंड' या कथासंग्रहांचा समग्रपणे विचार करता त्यांच्या लेखणीतून कोठेही कृत्रितमा, भावनेचे उदात्तीकरण दिसून येत नाही. त्यांची कथा माणूसकीवर नितांत श्रद्धा ठेवणारी आहे. सिंदगीकरांनी लेखनी हाताळताना मनाचा तोल ढळू न देता तटस्थवृत्तीने कथा निर्माण केली

आहे. त्यांनी आपल्या कथांच्या माध्यमातून ग्रामीण-दलित जीवनाबरोबर गावकुसाबाहेरील आदिवासी समाजाचे जीवन जगताना भेडसावणाऱ्या समस्यांचे वास्तववादी दृष्टिकोनातून चित्रण केले असल्याचे दिसून येते. कल्पनेचा हव्यास न धरता माणसांच्या सुख-दु:खाचे धागे-दोरे विणण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या लेखनीला स्वानुभवाचा आधार आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली महारांच्यामध्ये झालेल्या धर्मांतरामुळे निर्माण झालेला दलितांमधील अंर्त:संघर्ष, दलित-सवर्ण संघर्ष, दलितांबरोबर आदिवासी समाजाचे प्राथमिक गरजांबद्दल निर्माण झालेल्या समस्या, दलितांवर होणारे अत्याचार त्याचबरोबर शैक्षणिक, राजकीय क्षेत्राबावत निर्माण झालेला भ्रष्टाचार, समस्या या जाणिवेची बीजे कथासंग्रहामधून अभिव्यक्त होताना दिसतात. ठराविक असा एक प्रश्न उचलून न धरता सिंदगीकरांनी ग्रामीण-दलित-आदिवासी परिघातील प्रश्नांना परिवर्तनीय दृष्टिकोनातून उचलून धरलेले आहे. त्याचबरोबर त्यांनी आपल्या साहित्यातून विद्रोह, नकार, माणूसकी, वैज्ञानिकदृष्टी, परिवर्तनीय समाज या तत्त्वांचा एकत्रित विचार वाचकांसमोर मांडण्याचा प्रयत्न सिंदगीकरांनी केला आहे.

## • सिंदगीकरांचे कथा वाङ्मयातील स्थान :

१९६० नंतर मराठी साहित्यविश्वामध्ये वेगवेगळे वाङ्मयीन प्रवाह निर्माण झाले. त्यामध्ये दलित, ग्रामीण, स्त्रीवादी, जनवादी, विज्ञानवादी, इत्यादी वाङ्मय प्रवाहांचा प्रामुख्याने उल्लेख करता येतो. या वाङ्मयप्रवाहापैकी ग्रामीण व दलित हे वाङ्मयीन प्रवाह १९६० नंतरच्या कालखंडामध्ये भरभराटीस आलेले दिसतात. त्यापैकी ग्रामीण-दलित वाङ्मयप्रवाहाचा मध्य साधून १९९० नंतरच्या तरूण पिढीत विलास सिंदगीकर हे कथा निर्माण करतात. त्यांनी आपल्या कथा लेखनाने ग्रामीण-दलित जीवनाची सरमिसळ केली. त्यामुळेच सिंदगीकरांना ग्रामीण-दलित जीवनाची सांगड घालणारा कथाकार म्हणावे लागेल. आंबेडकरवादी भूमिका घेऊन त्यांनी आपली लेखनी समृद्ध केली. एक वास्तववादी लेखक असल्यामुळे त्यांनी समाजातील समस्यांचे वाचकांसमोर प्रकटीकरण करणे अधिक महत्त्वाचे मानले. त्यांनी आपल्या कथांतून सत्य मांडण्याचा प्रयत्न केला. त्याचप्रमाणे समाजपरिवर्तनाचे सूत्र केंद्रवर्ती ठेऊन

त्यांनी कथानिर्मिती केलेली दिसते आणि याच हेतूने त्यांनी समाजातील अंधश्रद्धा, रूढी-परंपरा, अज्ञान, भ्रष्ट राजकारण, आर्थिक समस्यावर कथालेखन केलेले दिसते.

एक कथाकार म्हणून विलास सिंदगीकरांनी ग्रामीण-दलित-आदिवासी जीवन-जाणिवांबरोबर तेथील संस्कृतीचे, माणसांचे, त्यांच्या सुख-दु:खाचे चित्रण प्रभावीपणे केले आहे. कारण त्यांनी त्या समाजातील माणसे, त्यांचे जीवन, समस्यांबरोबरच त्यांची सुख-दु:खे प्रत्यक्षात पाहिलेली अनुभवलेली असल्याचे प्रत्ययास येते. भारतीय समाजामध्ये उपेक्षित वर्गाचे असलेले स्थान त्याचप्रमाणे चार्तुवर्णीय व्यवस्थेमुळे निर्माण झालेली जाती-उपजातीच्या उतरंडी आपल्या कथातून मांडल्या आहे. त्यामुळेच की काय एक नवोदित प्रतिभावंत लेखक म्हणून त्यांनी अत्यंत महत्त्वाचे स्थान प्राप्त केले आहे. एक यशस्वी कथाकार म्हणून आपला स्वतंत्र ठसा उमठविण्याचा प्रामाणिक प्रयत्न सिंदगीकरांनी केला आहे. विलास सिंदगीकरासारख्या कलावंताची कलाकृती ही त्यांचे मन आणि भोवतालीचे वास्तव या द्वंदमूल देवघेवीतून जन्माला आलेले आहे. त्यामुळेच त्यांनी आपल्या वास्तव जाणिवांना कलाकृतीतून आविष्कृत केलेले दिसून येतात. असे जरी असले तरी एकूण दलित व ग्रामीण कथा वाङ्मयाच्या प्रवासात त्यांची कथा म्हणावी तितकी सखोल, चिंतनगर्भ आणि परिपक्व असल्याचा दावा करता येत नाही. मात्र त्यादृष्टीने ती समृद्ध होईल याच्या पाऊलखुणा त्यांच्या कथांतून दिसतात.

## निष्कर्ष :

१. आंबेडकरी प्रेरणा केंद्रवर्ती ठेऊन ग्रामीण व दलित साहित्याच्या सीमेवर दोन्ही जाणिवा व्यक्त करणाऱ्या नवीन पिढीतील साहित्यिकांमध्ये विलास सिंदगीकर हे एक महत्त्वाचे कथाकार आहेत.

२. मराठवाड्याच्या प्रादेशिकतेचे वास्तव चित्रण करणारा कलावंत म्हणून सिंदगीकरांचे कथालेखन महत्त्वाचे आहे.

३. सिंदगीकरांनी ग्रामसंस्थेबरोबर गावगाड्याच्या बाहेरील भटक्या जमाती आणि आदिवासी समाजाची वेदना मांडली आहे. त्यामुळे ग्रामीण, दलित आणि आदिवासी

अशा जीवन जाणिवांचे व्यापकत्व त्यांच्या कथेत दिसते.

४. ग्रामीण-दलित-आदिवासी समाजाप्रमाणे गावातील सवर्ण वर्गाचे चित्रण करताना आर्थिक, सामाजिक, राजकीय समस्याही त्यांच्या कथांतून मांडल्या आहेत.

५. मात्र अण्णा भाऊ साठे, बाबुराव बागूल, शंकरराव खरात इत्यादींच्या कथांतून जो विद्रोहाचे त्याचे ज्वलंत रूप दिसते ते सिंदगीकरांच्या कथेतून दिसून येत नाही.

६. मराठवाड्यासारख्या अवर्षणग्रस्त प्रदेश, तेथील भाषा, संवाद, निवेदन, निसर्ग, पात्र, वातावरण साकार करण्यात सिंदगीकर यशस्वी झाले आहेत.

७. सिंदगीकर यांनी वामन होवाळ यांच्या कथांप्रमाणे विनोदाची लकब आत्मसात केलेली दिसते. त्यामुळे गंभीर स्वरूपाच्या विषयाला विनोदाचे कलात्मक रूप प्राप्त होते.

८. सिंदगीकरांच्या समग्र कथांचा विचार करता त्यांच्या कथेने दलित व ग्रामीण कथेत काही भर घातली असे म्हणता येणार नाही. मात्र ग्रामीण व दलित कथेच्या सीमावर्ती अनुभवाचे वेगळेपण म्हणून वामन होवाळ, भास्कर चंदनशिव यांच्यानंतर विलास सिंदगीकर यांचाच उल्लेख करावा लागतो.

## संदर्भ :


| | | | |
|---|---|---|---|
| १. | डहाके, वसंत आबाजी | - | 'संक्षिप्त मराठी वाङ्मय कोश', १९२० पासून २००३ पर्यंतचा कालखंड जी. आर. भटकळ फाऊण्डेशन, मुंबई, पहिली आवृत्ती फेब्रुवारी २००४ पृ. ६५३. |
| २. | कुलकर्णी, वा. ल. | - | 'वाङ्मयातील वादस्थळे' पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पहिली आवृत्ती -१९४६, दुसरी आवृत्ती -ऑगस्ट १९६२ पृ. १० |
| ३. | डहाके, वसंत आबाजी | - | 'वाङ्मयीन संज्ञा-संकल्पना कोश जी. आर. भटकळ फाऊण्डेशन, मुंबई पहिली आवृत्ती, डिसेंबर २००१ पृ. ४०५ |
| ४. | जाधव, रा. ग | - | 'वाङ्मयीन निबंधलेखन' कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. आवृती तिसरी, १९८७, पृ. १२८. |
| ५. | पाटील, गंगाधर | - | 'कथनमीमांसा' अनुष्टुभ, दिवाळी अंक, (दुसरा / तिसरा) पृ. ९७ |
| ६. | तत्रैव | - | पृ. ११० |
| ७. | सिंदगीकर, विलास | - | 'भूकबळी' केदार ऑफसेट, उषाकिरण टॉकीज मागे, कैलास नगर, लातूर. प्रथमावृत्ती २१ एप्रिल २००३ पृ. ४६ |
| ८. | तत्रैव | - | पृ. ५४ |
| ९. | तत्रैव | - | पृ. ५८ |
| १०. | तत्रैव | - | पृ. ७२ |
| ११. | तत्रैव | - | पृ. ८१ |
| १२. | तत्रैव | - | पृ. ८२ |
| १३. | तत्रैव | - | पृ. ९९ |
| १४. | तत्रैव | - | पृ. १२२ |
| १५. | तत्रैव | - | पृ. १२२ |
| १६. | सिंदगीकर, विलास | - | 'गारपीट' संगत प्रकाशन, नांदेड प्रथमावृत्ती, नोव्हेंबर-२००५ पृ. ४८ |
| १७. | तत्रैव | - | पृ. ६५ |

१८. तत्रैव - पृ.८४

१९. तत्रैव - पृ.९१

२०. तत्रैव - पृ.९१

२१. तत्रैव - पृ.९३

२२. तत्रैव - पृ.११९

२३. तत्रैव - पृ.१०८

२४. तत्रैव - पृ.१३२

२५. तत्रैव - पृ.१३४

२६. तत्रैव - पृ.१०४

२७. तत्रैव - पृ.११४

२८. तत्रैव - पृ.४८

२९. सिंदगीकर, विलास - 'उतरंड' संगत प्रकाशन, नांदेड प्रथमावृत्ती, मार्च-२००८ पृ.३३

३०. तत्रैव - पृ.३४

३१. तत्रैव - पृ.४८

३२. तत्रैव - पृ.४८

३३. तत्रैव - पृ.८५

३४. तत्रैव - पृ.१२०

३५. तत्रैव - पृ.१२०

३६. तत्रैव - पृ.१२३

३७. तत्रैव - पृ.१२३

३८. तत्रैव - पृ.१२४

३९. तत्रैव - पृ.८१

४०. तत्रैव - पृ.१२८

४१. तत्रैव - पृ.१२९

४२. तत्रैव - पृ.१०५

४३. तत्रैव - पृ.१४६